## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.०३/का-५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- २५ नोव्हेंबर, २०२५.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५
मतदार यादीबाबत.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि. १६ जुलै, २०२५ व दि. २९ ऑक्टोबर, २०२५

महोदय,

संदर्भाधिन दि. १६ जुलै, २०२५ च्या आदेशान्वये मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश देण्यात आले आहेत. तसेच दि. २९ ऑक्टोबर, २०२५ च्या आदेशान्वये संभाव्य दुबार मतदारांबाबत करावयाची उपाययोजना विहित केली आहे. सदर आदेशांमध्ये अधिक स्पष्टता आणण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सदर आदेशाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे :-

### आदेश

विधानसभा मतदार यादीचे महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागात योग्य प्रकारे विभाजन करणे ही संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर जर त्यात काही चुका, उदा. १) लेखनीकांच्या चुका, २) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले, आणि ३) दि. ०१ जुलै, २०२५ च्या विधानसभा मतदार यादीत नावे असूनही संबधित प्रभागात नाव समाविष्ट झाली नाहीत, अशा बाबी स्वत:हून निदर्शनास आल्यास अथवा अन्य मार्गाने निदर्शनास आणण्यात आल्यास त्याची तात्काळ दखल घेऊन अंतिम मतदार यादी तयार करताना त्या चुकांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सदर बाब विचारात घेऊन अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर चुका दुरूस्त करण्याची तरतुद संदर्भाधिन दि. १६ जुलै, २०२५ च्या आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये केली आहे. त्यामुळे, प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर सुध्दा त्यात कोणत्याही चुका राहिल्याची बाब महानगरपालिका आयुक्तांच्या निदर्शनास आल्यास अशा चुकांची दुरूस्ती अंतिम मतदार यादी तयार करताना स्वत:हून ( Suo-moto ) करावी. सदर चुकांची दुरूस्ती करण्याकरीता कोणत्याही हरकती प्राप्त होण्याची आवश्यकता नाही.

काही महानगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे आल्या आहेत. महानगरपालिकेकडे देखील अशा तक्रारी येऊ शकतात. सदर तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित मतदार योग्य प्रभागात समाविष्ट झाले आहेत किंवा कसे याची तपासणी करण्यात यावी आणि जर असे मतदार चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाले असतील तर त्या मतदारांना योग्य प्रभागात समाविष्ट करुन अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात.

मात्र असे करताना केवळ बी.एल.ओ. अथवा तत्सम कर्मचाऱ्यांनी केलेल्या अहवालावर विसंबून न रहाता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याची खातरजमा करुन मतदार यादी सुधारीत करण्याची कार्यवाही करावी. दररोज प्राप्त होणाऱ्या हरकतींची तात्काळ तपासणी करुन शक्यतो त्याच अथवा दुसऱ्याच दिवशी त्याचा निपटारा होईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शेवटच्या दिवशी ताण येणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

२४.११.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Pradip\Corporation Note.docx